Vol 6 Issue 10 July 2017

ISSN No : 2249-894X

Monthly Multidisciplinary Research Journal

# Review Of Research Journal

Chief Editors

Ashok Yakkaldevi
**A R Burla College, India**

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies,
Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## Regional Editor

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad.

## *Advisory Board*

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal
University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA
UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University


Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: http://oldror.lbp.world/**

REVIEW OF RESEARCH

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 3.8014(UIF)
VOLUME - 6 | ISSUE - 10 | JULY - 2017



# शेती आधारित उद्योग व ग्रामीण विकास

प्रा. डॉ. प्रज्ञा बागडे
उपप्राचार्य व विभागप्रमुख, अर्थशास्त्र ,
पी.डब्ल्यू.एस.कला व वाणिज्य महाविद्यालय, नागपूर.

## प्रस्तावना :

कृषी हा भारतीय अर्थव्यवस्थेचा मूलाधार आहे. भारतातील ६८ : लोकसंख्या ग्रामीण भागात राहते व त्यातील ५८ : लोकसंख्या उपजीविकेसाठी कृषी क्षेत्रावर विसंबून आहे. मोठ्याा प्रमाणावरील दारिद्र्या हे ग्रामीण अर्थव्यवस्थेचे लक्षण असलेले दिसून येते आणि ग्रामीण दारिद्र्या हे बेरोजगारी व अल्परोजगारीचे फलन आहे. कृषीप्रधान राष्ट्रांचा विकास हा त्या देशातील ग्रामीण विकास व शेती आधारित उद्योगांच्या विकासावर अवलंबून असतो. स्थानिक कच्चामाल, कमी भांडवल, अल्प तंत्रज्ञान, रोजगारीची अधिक क्षमता इ. दृष्टीकोनातून शेती आधारीत उद्योग हे ग्रामीण भागात स्थापन होतात त्यामुळे त्यांची ग्रामीण भागाच्या विकासातील भूमिका महत्वाची ठरते.

ग्रामीण भागात रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधीची उपलब्धता करणे आवश्यक आहे. त्यासाठी ग्रामीण भागातील भांडवल व मनुष्य बळाचा प्रभावी वापर व्हावा यासाठी शेती आधारीत उद्योगांची स्थापना करुन कृषी क्षेत्राचा अर्थात ग्रामीण भागाचा विकास साधने शक्य आहे. प्रस्तुत शोधनिबंधात ग्रामीण भागातील शेती आधारीत उद्योगांचे महत्व, त्यांच्या समस्या व संधी जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

## शेती आधारीत उद्योग म्हणजे काय?

भारतातील शेती आधारित उद्योगास कृषी उद्योग, शेतीपूरक उद्योग, ग्रामीण उद्योग, शेती उद्योग असेही म्हटले जाते. ज्या उद्योगात शेतमालावर विविध प्रक्रिया केल्या जातात व ते उद्योग बहुतांशी ग्रामीण भागात सुरु केले जातात त्यांना शेती आधारीत उद्योग म्हणतात. अनेक उद्योगधंदे याखाली येतात. उदा. – कापड उद्योग, तेलबिया व तेलापासून होणारी उत्पादने, तंबाखू, फळांवरील प्रक्रिया, मद्यार्क, साखर कारखाने, वनोत्पादने, लाकडाच्या वस्तू, चामड्याच्या वस्तू इ. उद्योगधंदे ह्याा वर्गात मोडतात. अल्पभांडवलात आणि अल्पवेळात पूर्ण होणाऱ्या अनेक कृषी उद्योगांना अजूनही वाव आहे.

*व्याख्या .* The National Council of Applied Economics Research नुसार, ‘शेतमालावर प्रक्रिया करणारे व शेतीसाठी लागणारी अवजारे, खते, बी.बियाणे, किटकनाशके इ. निर्माण करणाऱ्या उद्योगांना कृषी उद्योग म्हणतात’.

शेती आधारित उद्योग व इतर उद्योग यात फरक करण्याच्या दृष्टीने नियोजन आयोगाने चार निकष निश्चित केले आहे. हेच निकष पुढे राष्ट्रीय विकास परिषदेकडूनही मान्य करण्यात आले आहेत.

१. शेतीकरीता प्रभावी आदाने (Inputs) निर्माण करण्यासाठी प्रयत्न करणे.
२. शेतमालावर प्रक्रिया करण्यासाठी व त्यांचे रुपांतर करण्यासाठी मदत करणे.
३. प्रक्रिया केलेल्या वस्तूंना चांगला मोबदला मिळवून देण्याची खात्री देणे.
४. शेतीचे उत्पादन वाढविण्यास मदत करणे.

## शेती आधारित उद्योगांचे महत्व .

भारत हा विकसनशील देश असून या देशाच्या ग्रामीण विकासात शेती आधारीत उद्योगांची भूमिका अत्यंत महत्वाची ठरत आहे.

१. भारतातील गावांची समृद्धी व पुनर्निर्माण कृषी आधारीत उद्योगांच्या माध्यमातूनच शक्य आहे. बिजेन्द्रनाथ बॅनर्जी यांनी विकसीत व औद्योगिक देशांच्या अनुभवावरुन असे मत मांडले होते की, देशाच्या एकूण विकासात ग्रामीण व ग्रामीण विकासात कृषी उद्योग महत्वाचे आहेत. कृषी क्षेत्र व औद्योगिक क्षेत्र एकमेकांचे प्रतिस्थापन करु शकत नाही. त्यामुळे ते एकमेकांना पुरक आहेत म्हणून दोन्ही क्षेत्रांचा विकास साधणे गरजेचे आहे.

२. माजी पंतप्रधान मनमोहन सींग यांनी देखील राष्ट्रीय विकास परिषदेतील आपल्या भाषणात म्हटले होते की, कृषी क्षेत्राला नवसंजीवनी दिल्याशिवाय सर्व समावेशक विकासाचे ध्येय साध्य करणे शक्य होणार नाही. त्यामुळे शेतकऱ्यांकडे विशेषत्वाने लक्ष देण्याची गरज आहे.

३. ग्रामीण औद्योगिकरणामुळे भांडवलात गतीशीलता आणता येते. उद्योग कौशल्यामध्ये गतीशिलता आणता येते. ग्रामीण लोकांचे शहराकडे होणारे स्थलांतरण थांबवून खेडी ओस व शहरे बकाल होण्यापासून वाचविता येतात.

४. ग्रामीण भागाच्या समतोल विकासासाठी या उद्योगांचे योगदान जास्त आहे. हे उद्योग शहरात केंद्रीत न होता ग्रामीण भागात केंद्रीत होत असल्यामुळे शहरीकरणाचे वाढते दुष्परीणाम टाळता येतात व ग्रामीण भागाचे अस्तीत्व निर्माण होईल.

५. आपल्या देशात भांडवलाचा तुटवडा असल्याने कमी भांडवलात हे उद्योग करता येतात. या उद्योगासाठी लागणारा कच्चा माल, हा स्थानिक स्वरुपाचा असल्याने तो कमी किंमतीस व गुणवत्ताधारक मिळतो. त्यामुळे या उद्योगातील उत्पादन कमी खर्चात होण्यास मदत होते.
६. ग्रामीण भागात शेती आधारीत उद्योगांच्या विकासामुळे सामाजिक व आर्थिक सुविधांचा विकास होतो. तसेच साठागृहे, बाजारपेठ, यांच्या विकासासाठी, निर्यात वृद्धी व सहकाराच्या विकास आणि ग्रामीण उपक्रमशीलतेसाठी या उद्योगांचे महत्व जास्त आहे.
७. या उद्योगांच्या विकासामुळे लोकांना वाढत्या प्रमाणात रोजगार मिळत असून त्यांचे उत्पन्न वाढते. त्यामुळे त्यांची ग्रामीण बचत वाढत जाऊन भांडवल निर्मितीस हातभार लागतो.
८. जलद ग्रामीण औद्योगिकरणामुळे विकसनशील देशात रोजगारीच्या संधीमध्ये वाढ होते. ग्रामीण भागातील कृषी आधारीत उद्योगात निर्माण झालेल्या रोजगारीमुळे तेथील कृषी क्षेत्राच्या भरभराटीस सहाय्य होते.
९. शेती आधारीत उद्योग हे ग्रामीण भागात स्थापन होत असल्यामुळे ग्रामीण बेकारी व ग्रामीण दारिद्र्याचा कमी होण्यास मदत होते.
१०. कृषी आधारीत ग्रामोद्योगांमुळे औद्योगिक विकेंद्रीकरण करणे शक्य होते. राष्ट्रीय उत्पन्नाचे समान वितरण होण्यास मदत होते.
११. जगातील अनेक विकसनशील देशांनी ग्रामीण विकसासाठी कृषी आधारीत उद्योगांना प्राधान्य दिले आहे.
१२. देशातील आर्थिक विषमता कमी करण्यासाठी व ग्रामीण क्षेत्राचे उत्पन्न वाढविण्यासाठी या उद्योगांचे महत्व आहे.
१३. या उद्योगांमध्ये विविध प्रकारच्या वस्तू निर्माण केल्या जात असल्यामुळे अनेक वस्तूंची खरेदी एकाच छताखाली शक्य होते.
१४. आपल्या देशात नैसर्गिक साधन संपत्ती विपूल प्रमाणात असून तिचा पर्याप्त वापर होण्यासाठी शेती आधारीत उद्योग महत्वाचे ठरतात.
१५. देशातील आर्थिक विषमता कमी करण्यासाठी व ग्रामीण क्षेत्राचे उत्पादन वाढविण्यासाठी या उद्योगांचे महत्व जास्त आहे.
१६. या उद्योगात औषधी वस्तूंचे उत्पादन होत असल्याने डोंगराळ व दुर्गम भागात वास्तव्य असलेल्या आदिवासी समाजाच्या विकासात मदत होते.
१७. पशुपालन, कुक्कुटपालन, मासेमारी, फळ प्रक्रिया इत्यादी उद्योगांसाठी अल्पप्रमाणात तांत्रिक ज्ञान लागते त्यामुळे उत्पादकास तांत्रिक ज्ञानाची आयात करावी लागत नाही.
१८. या उद्योगांचे स्वरुप लहान असल्याने ते अल्पशा जागेत सुरु करता येतात. त्यामुळे उत्पादकास स्थीर घटकांवर जास्तीचा खर्च करावा लागत नाही.
१९. शेती आधारीत उद्योगंमुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेत गुणात्मक परिवर्तन करणे शक्य होते.

### *शेती आधारीत उद्योगांसमोरील समस्या .*

१९९० च्या दशकात भारत सरकारने मुक्त अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला. मूळात मुक्त अर्थव्यवस्थेचा स्वीकार म्हणजे आव्हानांचे पॅकेज होते.
१. उद्योगाला लागणारा कच्चामाल साठवून ठेवण्याची पुरेशी व्यवस्था नसल्यामुळे केवळ तीन महीने पुरेल एवढाच कच्चामाल साठवून ठेवता येतो. तसेच तयार उत्पादन साठवून ठेवण्यासाठी व्यवस्था आवश्यक आहे. ती उपलब्ध नसल्यामुळे मोठ्या प्रमाणावर उत्पादन करुन महामान उत्पादनाचे फायदे घेता येत नाही.
२. उत्पादकाला स्वतःला ग्राहकांना विक्री करणे शक्य नाही त्यामुळे मधली व्यापारी लोकांची जी साखळी असते त्यांना बराच वाटा जातो. व्यापाऱ्यांना त्यांच्या गुंतवणुकीवर २४ प्रतिशत नफा प्राप्त होतो. याचाच अर्थ उत्पादन करणाऱ्या उत्पादकापेक्षा व्यापाऱ्याला १४ प्रतिशत अतिरिक्त नफा मिळतो म्हणजेच उत्पादकांना पुरेसा नफा मिळत नाही.
३. जिथे धान्य, फळे आणि भाजीपाला निर्माण होतो तिथे त्या प्रमाणात त्यांच्या संकलनाची, साठवणुकीची आणि निर्यातीसाठीच्या योग्य यंत्रणेची व्यवस्थाच उपलब्ध नाही परिणामी फळे आणि भाजीपाला यांचे जितके उत्पादन होते त्याच्या ४० टक्क्याहून अधिक उत्पादनाच्या साठवणुकीची योग्य व्यवस्था नसल्याने नासाडी होते. शेती क्षेत्रातील उत्पादकता ही एक चिंतेची बाब आहे.
४. उस आणि कापूस ह्या सारखी पिके पैशाची पिके म्हणून शेतकऱ्यांनी स्वीकारली असली तरी त्यांना मिळणाऱ्या दरांच्या तुलनेत त्यांचा उत्पादन खर्च तसेच देशातील आयात.निर्यात धोरण या सर्वांचा परिणाम या पिकांच्या लागवडीवर सातत्याने होत असतो.
५. कधी कधी उत्पादन उत्तम दर्जाचे असूनही आय.एस.आय. किंवा एगमार्क यासारखे मानांकन प्राप्त झालेले नसल्यामुळे निर्यातक्षम उत्पादन असतांनाही प्रत्यक्ष निर्यात करणे शक्य झालेले नाही.
६. सहकार चळवळीने काही प्रदेशात उत्पादन वाढले खरे पण कालांतराने सहकारी चळवळीतील व्यावसायिक दृष्टीकोणाचा अभाव व राजकारणात प्रवेश करण्यासाठीची एक पायरी म्हणून सहकारी संस्थांचा वापर करणे यातून सहकारी चळवळ आणि उस शेती यावर आरिष्ट निर्माण झाले.
७. शेतजमीनीचा वापर अन्य कारणांसाठी वाढत गेल्याने शेतजमीन घटायला लागली. शेती परावलंबी व्हायला लागली आणि त्यातून छोटा शेतकरीही कर्जबाजारी झाला व आत्महत्या करु लागला.
८. उद्योग स्थापन करण्यासाठी प्रशिक्षणाची गरज असते. त्यामुळे प्रशिक्षणाखेरीज ग्रामीण लोक उद्योग करण्यास धजावत नाही आणि सोयीच्या ठिकाणी व सोयीच्या वेळी प्रशिक्षण उपलब्ध होत नाही.
९. उत्पादीत मालाच्या विक्रीसाठी, बाजारपेठ विस्तारण्यासाठी मालाला आकर्षक वेष्टनाची गरज आहे. त्यासाठी प्रशिक्षणाची गरज आहे.
१०. स्थानिक पातळीवर मागणी होत नसल्यामुळे प्रक्रिया, पॅकिंग व वाहतुकीचा खर्च बराच जास्त येतो.
११. शिक्षण.प्रशिक्षण सुविधांच्या अभावामुळे कामगारांची कार्यक्षमता वाढविण्यात अनेक अडचणी येतात.
१२. मोठ्या प्रमाणावर उत्पादनासाठी भांडवलाची गरज असते. परंतु ते सहजतेने उपलब्ध होत नाही.
१३. वाहतूक दळणवळणाच्या सोयींचा अभाव असल्यामुळे या उद्योगातील वस्तूंचा बाजारपेठेत होणारा पुरवठा वेळेत होत नाही.
१४. कच्च्या मालाची कमतरता असल्यामुळे उद्योगांच्या विकासात अडचणी येतात.
१५. या उद्योगांना भांडवलाच्या तुटवड्यामुळे अनेक प्रश्नांना तोंड द्यावे लागते.
१६. विक्री व्यवस्थेत अनेक दोष असल्याने या उद्योगांना चांगले उत्पन्न मिळत नाही.
१७. भार नियमनामुळे या उद्योगांचा उत्पादन खर्च वाढत आहे.

यव्यतिरितक्त लोकांच्या आवडी.निवडीनुसार उत्पादन करणे अशक्य होत आहे. सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे हे उद्योग मेटकुटीस

आले आहे. या उद्योगांमधील वस्तूंच्या किंमतीचा प्रश्नही जटील झाला आहे.

*उपाययोजना :*

अभ्यास करीत असतांना कृषी आधारित उद्योगांच्या समस्यांचा विशेष अभ्यास करण्यात आला. त्या समस्यांच्या अनुशंगाने काही उपाययोजना या ठिकाणी विशद केल्या आहेत.

१. शेती आधारीत उद्योगांची स्थापना ग्रामीण भागात करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या आधारभूत सोयी.सुविधा जसे वीज, पाणी, रस्ते, अधिकोष, प्रशिक्षण संस्था इ. निर्माण केल्यास ग्रामीण शेती आधारीत उद्योग सुरु करण्याची प्रेरणा ग्रामीण लोकांना मिळेल. त्यातून रोजगार निर्मिती, उत्पन्न वाढ, दारिद्र्या निर्मूलन यासारख्या गोष्टी साधल्या जातील.

२. शेती आधारीत उद्योग ग्रामीण भागात स्थापन केले तरी त्यामध्ये उत्पादित होणाऱ्या उत्पादनाला देशी बाजारपेठेसोबतच आंतरराष्ट्रीय बाजारपेठ उपलब्ध व्हावी म्हणून  निर्यातक्षम उत्पादन करण्यासाठी उद्योजकांना प्रेरित करण्यासाठी निर्यातीकरिता आवश्यक सुविधा त्यांना सहज आणि सोपेपणाने उपलब्ध व्हावी यासाठी शासनाने प्रयत्न करावे.

३. भारतात ८० टक्के कोरडवाहू शेतकऱ्यांचे प्रमाण आहे. हा शेतकरी जे उत्पादन घेतो ते बाजारपेठेत नेल्यानंतर माल चांगल्या दर्जाचा नाही, त्यात ओलावा अधिक आहे, माती अधिक आहे अशी कारणे दाखवून मालाचे वजन मूळात असते त्यापेक्षा किमान १० टक्के कमी मानले जाते. बाजारपेठेच्या यंत्रणेसाठी पून्हा शेतकऱ्याला वेगळे पैसे द्यावे लागतात. अशा पद्धतीने होणारे शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी मुळात उद्योगाचे निकष लावून शेती नियोजन करावयास हवे व उद्योजकाची मानसिकता प्रत्येक गावापर्यंत कशी पोहचेल यादृष्टीने प्रयत्न व्हावेत.

४. शेती आधारीत उद्योगांच्या विकासासाठी शेती आधारित उद्योग विकास महामंडळाची स्थापना करण्यात यावी. ज्या अंतर्गत या उद्योगांसाठी प्रशिक्षण, वित्तपुरवठा, अनुदान देवून ग्रामीण तरुणांना शेती आधारीत उद्योग स्थापन करण्यासाठी आकर्षित करता येईल.

५. कृषी आधारीत उद्योग ग्रामीण भागातच आणि शेतकरी, शेतमजूर यांनी सहकारी तत्वावर किंवा बचतगटाच्या माध्यमातून सुरु करण्यास प्राधान्य देण्यात यावे. जेणेकरुन ग्रामीण भागातील लोकांच्या उत्पन्न स्तरात वाढ होवून ग्रामीण विकास साधने शक्य होईल.

६. जगभर शेतीमध्ये सातत्याने विविध प्रयोग केले जात आहे. शेतजमीन घटत असतांना अलीकडेच अंतराळात जिनीयाचे फूल फूलविण्याचा प्रयत्न शास्त्रज्ञांनी करुन दाखविला आहे. त्यामुळे भविष्यात जमीनीवरच नव्हे तर अन्यत्रही पीक घेण्याच्या पद्धती विकसीत झाल्यातर आश्चर्य वाटू नये. शेतीतील बदलते तंत्र आणि वेगवेगळे प्रयोग आत्मसात करण्याची मानसिकता शेतकरी वर्गामध्ये तयार केली जायला हवी. तसेच नवे तंत्र आणि प्रयोग शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी योग्य व्यवस्था हवी.

७. वेगळा कृषी अर्थसंकल्प दरवर्षी सादर करण्यात यावा जेणेकरुन एकूणच कृषी क्षेत्राच्या विकासासाठी आर्थिक तरतूद करणे शक्य होईल. शेती आधारीत उद्योगांना विशेष प्राधान्य देवून ग्रामीण विकास पर्यायाने राष्ट्र विकास साधण्यास मदत होईल.

८. या व्यतिरिक्त या उद्योगांच्या विकासाकरीता बॅंकांनी अल्प व्याजदराने कर्ज पूरवठा करावा, देशातील सींचनव्यवस्थेत सुधारणा करणे व वाढविणे आवश्यक आहे, भारनियमन पद्धत बंद करावी, साठागृहे व गोदाम व्यवस्थेत सुधारणा करावी, नियंत्रित बाजारपेठेंची संख्या वाढवावी, वाहतूक व दळणवळण सुविधा गुणवत्ताधारक व आवश्यक इतकी असणे आवश्यक आहे, निर्यातवृद्धीसाठी सरकारने निर्यात कर रद्द करुन निर्यातीवरील बंधने दूर करावीत.

९. शेती आधारीत उद्योगांच्या विकासासाठी प्रशिक्षण व संशोधन सुविधा उपलब्ध करावी. या उद्योगांना आधुनिक साधनांची खरेदी करण्याकरीता सरकारने कर्जपूरवठा करावा. तसेच उद्योगांच्या विकासासाठी अनुदाने द्यावीत.

सरकारने वरीलप्रमाणे उपाय केल्यास या उद्योगांच्या विकासास मदत होईल. भारत हा खेड्यांचा देश आहे. खेडी सुधारली तर ग्रामीण भागात सुधारणा होतील म्हणून ग्रामीण भागात चालणारे शेती आधारीत उद्योग हे ग्रामीण विकासाचे आधारस्तंभ आहेत असा सर्व पातळीवर विचार होणे आवश्यक आहे.

*संधी .*

१. आज भारतीय शेती आधुनिकतेकडे वळू पाहते आहे. भारतीय शेतकरी परंपरागत पिकांसोबतच आता नवनवीन उत्पादन घेतो आहे. उत्तम दर्जाच्या शेतमालावर अनेक प्रकारच्या प्रक्रिया केल्या जात आहेत. उर्वरीत माल शीतगृहात साठवतो आहे. नवीन प्रयोग करण्याची क्षमता दिवसेंदिवस वाढत आहे. सर्वात महत्वाचं म्हणजे देश. विदेशातील बाजार समजून घेतो आहे. हे स्वप्नवत वाटणारं चित्र आता भारतातही मोठ्या प्रमाणात दिसू लागलं आहे.

२. भारतातील शेतमाल प्रक्रिया उद्योगांचे ग्राहक शंभरावर देशात आहेत आपल्याकडे मॉल्समध्ये शेतमाल प्रक्रिया उद्योगांच्या वस्तू उपलब्ध आहेत त्या वस्तू अमेरिकेतील काही मॉल्समध्ये देखील उपलब्ध आहेत. आपल्याकडे पॅकींग फुडचं महत्व वाढत चाललं आहे. मॉल्समध्ये कापून निवडून तयार केलेल्या पालेभाज्यांच्या विक्रीत खूपच वाढ झालेली दिसते.

३. सरकार मेक इन इंडिया अंतर्गत तब्बल १४ हजार कोटी रुपये शेती प्रक्रिया उद्योगांसाठी खर्च करणार आहे. देशामध्ये ४२ मेगा फूड पार्क्स उभारले जाणार आहे. त्यापैकी ५ फूड पार्क्सची उभारणी पूर्ण झालीय. यातून तीन लाख लोकांना रोजगार उपलब्ध होवून सुमारे १२ लाखावर शेतकऱ्यांना त्याचा फायदा होणार आहे. गुजरात राज्यातील खेडा गावात सुरु केलेल्या अमूल प्रकल्पानं आज विशालकाय रुप धारण केले आहे.

*निष्कर्ष .*

कृषी आधारित उद्योग व ग्रामीण विकास ह्या अध्ययनातून खालील निष्कर्ष निघाले आहेत. आग्राचा पेढा, चितळ्यांची बाकरवडी, अमूलचं आईसक्रीम, हल्दीरामची मिठाई, बंगाली मिठाई, महाराष्ट्रीयन पापड या सर्वांनी जागतिक बाजारपेठेत आपलं स्थान मिळवलं आहे. ते स्थान मिळवणं नव्याने पदार्पण केलेल्या उद्योगांनाही शक्य आहे. गरज आहे मी फक्त इच्छा शक्ती आणि परिश्रमाची.

१. मेक इन इंडियाच्या संकल्पनेतील ग्रामीण रोजगाराचे, उत्तम दर्जाच्या उत्पादनाचे व निर्यात वाढीचे उद्दिष्ट शेती आधारीत उद्योगातून साध्य होईल. यातून ग्रामीण विकास करण्याचे स्वप्न खऱ्या अर्थाने साध्य होईल.

२. शेतातील उत्पादित मालावर प्रक्रिया करणे, खऱ्या अर्थाने कृषी उद्योग मोठ्या प्रमाणात विकसीत होण्याला वाव आहे. प्रामुख्याने फळ प्रक्रिया उद्योग मोठ्या प्रमाणात विस्तारावा लागेल.

३. देशातील ग्रामीण भागात कृषी प्रक्रिया उद्योग सुरु केल्यास शेतातील कच्च्या मालाला तेथेच बाजारपेठ उपलब्ध होईल. शेतकऱ्यांची आर्थिक

स्थिती सुधारुन व रोजगारात वृद्धी होवून ग्रामीण भागातील होणारे स्थलांतर थांबेल.
४. मेक इन इंडिया अंतर्गत या उद्योगांसाठी ज्या सुविधा व सवलती देऊ केल्या गेल्या आहेत त्याचा फायदा भारतातील शेतकरी व उद्योजक कसा घेणार ही अत्यंत महत्वाची बाब आहे.
५. अन्न प्रक्रिया उद्योगगात दळलेले धान्य, साखर, खाद्यतेल, पेये, फळे आणि भाजीपाला प्रक्रिया व दुग्धजन्य पदार्थ यांचा समावेश आहे. या उद्योगांना प्रोत्साहन मिळावे.
६. मोठ्याा प्रमाणावर उत्पादन करण्यासाठी भांडवलाची गरज असते. परंतु ते सहजतेने उपलब्ध होत नाही.
७. कृषी पर्यटन उद्योगही हा नव्यानेच विकसीत होणारा उद्योग आहे. त्यामध्ये वाढ होणे आवश्यक आहे.
८. कृषी उत्पादनांच्या निर्यातीत भारताचा सध्या ६ वा क्रमांक आहे तितका कायम राहावा यासाठी विशेष प्रयत्न व्हावे.

*संदर्भसूची .*

१. ढमढरे एस.व्ही., भारतीय अर्थव्यवस्था, प्रथम आवृत्ती २००८, डायमंड पब्लि. पुणे.
२. संतोष दास्ताने, महाराष्ट्र वार्षिक २०१३, नितीन प्रकाशन, पुणे.
३. कविमंडन विजय, कृषी अर्थशास्त्र, मंगेश प्रकाशन, नागपूर.
४. उद्योजक, दिपक देशमुख, मार्च २०१३, एप्रिल २०१३.
५. देसाई दृ भालेराव, भारतीय अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन, पुणे.
६. ढाले रविन्द्र, डॉ.पंजाबराव देशमुख यांचे कृषीविषयक आर्थिक विचार, २००६.
७. अर्थसंवाद, जुलै . सप्टेंबर, २०१५.
८. अर्थसंवाद, जानेवारी . मार्च, २०१६.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : http://oldror.lbp.world/